| | |
|---|---|
| दाखल दिनांक | १०.०८.२०१६ |
| नोंदणी दिनांक | १०.०८.२०१६ |
| निकाल दिनांक | १२.०५.२०२६ |
| कालावधी | ०९ वर्ष ०९ महिने ०२ दिवस |

# कोपरगाव येथील

## अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात जि. अ.नगर.

**(पीठासीन अधिकारी – संजय छ. खैरनार)**

**[न्यायनिर्णय दि. १२/०५/२०२६]**

**संक्षिप्त फौ.खटला क्र. ३६६/२०१६** **निशाणी क्र.७२**

(गु.र.क्र. II–०६/२०१३ पोलिस स्टेशन: कोपरगाव शहर)

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**,<br>तर्फे पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, कोपरगाव शहर,<br>ता. कोपरगाव, जि. अ. नगर. |
| यांच्या वतीने | श्री. पी. डी. रणधीर,<br>विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | १.**सय्यदनुर कारभारी शेख**,<br>वय – ५५ वर्षे, धंदा – शेती,<br>रा.चांदेकसारे, ता. कोपरगाव, जि.अ.नगर.<br>२. **विनायक मुरलीधर गायकवाड**,<br>वय – ४५ वर्षे, धंदा – व्यापार,<br>रा.सह्याद्री कॉलनी, कोपरगाव.<br>३. **रविकिरण शंकरराव ढोबळे**,<br>वय – ४० वर्षे, धंदा – फोटोग्राफी,<br>रा. गांधीनगर, कोपरगाव, ता.कोपरगाव. |

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

| | |
|---|---|
| | ४. **अक्षय अरविंद क्षत्रिय**,<br>वय – ४० वर्षे, धंदा – हॉटेल,<br>रा. गांधीनगर, कोपरगाव, ता.कोपरगाव.<br>५. **बाळासाहेब माणिकराव वाघ**,<br>वय – ४५ वर्षे, धंदा – व्यापार,<br>रा. कोपरगाव, ता. कोपरगाव.<br>६. **चेतन टेकचंद खुबाणी**,<br>वय – ४२ वर्षे, धंदा – व्यापार,<br>रा. धारणगाव रोडा, कोपरगाव, ता. कोपरगाव.<br>७. **राजेंद्र बाबुराव खैरे**,<br>वय – ५२ वर्षे, धंदा – व्यापार,<br>रा. येवला रोड, कोपरगाव, ता. कोपरगाव.<br>८. **सुभाष सुखदेव दवंगे**,<br>वय – ४२ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. रवंदे, ता. कोपरगाव.<br>९. **राजेंद्र अशोकराव खिलारी**,<br>वय – ४४ वर्षे, धंदा – शेती,<br>रा.दहेगाव लौकी, ता. कोपरगाव.<br>१०.**सुभाष आनंदराव शिंदे – मयत**. |
| यांच्या वतीने | श्री. एम.एस. खिल्लारी, विद्वान विधीज्ञ |

| | |
|---|---|
| **गुन्ह्याची तारीख** | दि. २४.०१.२०१३ |
| **फिर्याद तारीख** | दि. २४.०१.२०१३ |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि. ०८.१२.२०१५ |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि. २९.०१.२०२० |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि. २८.०८.२०२५ |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | --- |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि. १२.०५.२०२६ |

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

| | |
|---|---|
| **आरोपींना शिक्षा असेल तर शिक्षा सुनावल्याची तारीख** | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामिनवर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | दोषमुक्त की दोषसिध्द | सुनावलेली शिक्षा | फौ प्र सं कलम ४२८ च्या कारणासाठी संपरीक्षेदरम्यान व्यतीत केलेला तुरुंगवास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सय्यदनुर कारभारी शेख | ०८.१२.२०१५ | --- | मुंबई पोलिस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | -''- | -''- |
| २. | विनायक मुरलीधर गायकवाड | | | | | | |
| ३. | रविकिरण शंकरराव ढोबळे | | | | | | |
| ४. | अक्षय अरविंद क्षत्रिय | | | | | | |
| ५. | बाळासाहेब माणिकराव वाघ | | | | | | |
| ६. | चेतन टेकचंद खुबाणी | | | | | | |
| ७. | राजेंद्र बाबुराव खैरे | | | | | | |
| ८. | सुभाष सुखदेव दवंगे | | | | | | |
| ९. | राजेंद्र अशोकराव खिलारी | | | | | | |
| १०. | **सुभाष आनंदराव शिंदे** | **संपरिक्षेदरम्यान दि.२७.०४.२०२१ रोजी आरोपी मयत झाल्याने नि.१ वरील आदेशान्वये आरोपीविरुध्दचा खटला संपुष्टात आला.** | | | | | |

(संजय छ. खैरनार)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

दिनांकः १२.०५.२०२६

**<u>साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार</u>**

**अ) <u>अभियोगपक्ष</u> :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| अ.सा.१ | अमित साहेबराव खोकले | घटनास्थळ पंच/(नि.न.४३) |
| अ.सा.२ | सुभाष बाबाराव आव्हाड | पोलिस साक्षीदार /(नि.न.५८) |
| अ.सा.३ | संजय पंढरीनाथ घोरपडे | पोलिस साक्षीदार / (नि.न.५९) |

**ब) <u>बचावपक्ष</u> :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| - | - | - |

**क) <u>कोर्ट साक्षीदार</u> :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**<u>अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.</u>**

**अ) अभियोग पक्ष**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब) <u>बचावपक्ष</u> :**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

क) <u>कोर्ट</u> :

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड) <u>मुद्देमाल</u> :

| क्र. | मुद्देमाल | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(न्यायनिर्णय आज दिनांक १२.०५.२०२६ रोजी खुल्या न्यायालयात जाहीर केला)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द मुंबई पोलिस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन की,**

२. खबर देणार पोलीस नाईक प्रदीप बाळासाहेब काशिद यांच्यानुसार ते कोपरगाव पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत आहेत. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील आदेश क्र.डीसी/कार्या/९ब–१/२०/२०१३ दि.१७.०१.२०१३ अन्वये दि.१८.०१.२०१३ रोजीचे ००.०० पासुन ते दि.०१.०२.२०१३ रोजीचे २४.०० वाजेपावेतो अहमदनगर जिल्ह्याचे महसुल स्थळसीमेच्या हद्दीत मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये जमाव बंदी व शस्त्रबंदी आदेश जारी करण्यात आलेला होता.

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

३. दिनांक २४.०१.२०१३ रोजी पोलीस स्टेशनला हजर असताना स.पो.नि.पवार यांनी त्यांना व पो.स.ई. पवार, पो.ना.बोटे, पो.ना.घोरपडे, पो.ना.आव्हाड, पवार, पो.कॉ.सोनवणे यांना कळविले की, शिवाजी पुतळ्यासमोर रोडवर सार्वजनिक ठिकाणी कोपरगाव येथील भा.ज.पा. व बजरंग दलाचे कार्यकर्ते जमलेले असुन केंद्रीय गृहमंत्री श्री.सुशिलकुमार शिंदे यांनी भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा भगवा दहशतवाद व हिंदु अतिरेकी संघटना बनविणा-या संघटना असा उल्लेख केल्याने सदरचे कार्यकर्ते त्या ठिकाणी घोषणाबाजी करत आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी जावुन कायदेशीर कारवाई करणे आहे असे कळविल्याने ते सर्वजण मोटारसायकलवरुन शिवाजी पुतळ्याजवळ १२.१५ वाजता आले. त्यावेळी त्या ठिकाणी भा.ज.प.व बजरंग दलाचे मिळुन १५ ते २० कार्यकर्ते रोडवर सार्वजनिक ठिकाणी जमुन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे मुर्दाबाद अशा घोषणा देवुन केंद्रीय गृहमंत्री यांचा प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले व त्यानंतर मोर्चा नेवुन मा.तहसिलदार, कोपरगाव यांना निवेदन दिले व जमाव व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याची वरील आशयाची फिर्याद सरकारच्यावतीने आरोपींविरुध्द दाखल केली.

४. खबर देणार याच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल श्री.एस.एन.दहिफळे व

पो.नि.शरद जांभळे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान साक्षीदार यांचे जाबजबाब नोंदविले. घटनास्थळ पंचनामा केला, तपासाअंती आरोपींनी जमाव व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचे आढळुन आल्याने आरोपीविरुध्द मुंबई पोलिस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

**५.** माझे पूर्व न्यायीकअधिकारी यांनी त्यांच्याविरुध्द असलेले दोषारोप त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले. आरोपींना गुन्हा केल्याचे नाकारुन संपरिक्षा घेण्याची तयारी दर्शविल्याने आरोपींविरुध्द मुंबई पोलिस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ अन्वये प्रमाणे प्रतिकथन निशाणी ४३ वर निश्चित करण्यात येवून संपरीक्षा घेण्यात आली.

**६.** फिर्यादी व साक्षीदार यांच्या पुराव्यामध्ये आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा आल्याने आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये जबाब नि.क्र.६२ ते ७० अन्वये नोंदविण्यात आलेला आहे.

**७.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा.सरकारी वकील श्री. पी. डी. रणधीर व आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. एम. एस. खिलारी यांचा युक्तिवाद ऐकला व अभियोग पक्षाचे कथन विचारात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह निष्कर्ष देत आहे;

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २४.०१.२०१३ रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास, शिवाजी पुतळयासमोर, मेनरोडवर सार्वजनिक ठिकाणी, कोपरगाव, ता.कोपरगाव येथे भारतीय जनता पार्टी, कोपरगाव व बजरंग दल, कोपरगाव यांनी मिळुन केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी हिंदु धर्माविषयी केलेल्या वक्तव्याचे निषेधार्थ सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमुन घोषणाबाजी करुन त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले व विना परवाना मोर्चा काढला तसेच जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील आदेश क्र. डीसी/कार्या/९ब–१/२०/२०१३ दि.१७.०१.२०१३ अन्वये दि.१८.०१.२०१३ चे रात्रीचे ००.०० ते दि.०१.०२.२०१३ रोजीचे रात्रीचे २४.०० वाजेपावेतो अहमदनगर जिल्ह्याचे महसुल स्थळसिमेच्या हद्दीत मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केले व त्यायोगे मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त केले.** |

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता :**

८. आरोपींविरुध्द मुंबई पोलिस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ अन्वये दोषसिध्दी करण्याकरिता घटनेच्या दिवशी व वेळी शिवाजी पुतळयासमोर, मेनरोडवर सार्वजनिक ठिकाणी, कोपरगाव, ता.कोपरगाव येथे भारतीय जनता पार्टी, कोपरगाव व बजरंग दल, कोपरगाव यांनी मिळुन केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी हिंदु धर्माविषयी केलेल्या वक्तव्याचे निषेधार्थ सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमुन घोषणाबाजी करुन त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले व विना परवाना मोर्चा काढला. जिल्हाधिकारी,अ.नगर यांच्याकडील आदेश क्र. डीसी/ कार्या/९ब–१/२०/२०१३दि.१७.०१.२०१३अन्वये दि.१८.०१.२०१३ चे रात्रीचे ००.०० ते दि.०१.०२.२०१३ रोजीचे रात्रीचे २४.०० वाजेपावेतो अहमदनगर जिल्ह्याचे महसुल स्थळसिमेच्या हद्दीत मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचे अभियोग पक्षाने निर्विवादपणे शाबीत करणे आवश्यक आहे.

९. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला पंच साक्षीदार क्र.१ याने त्याच्या पुराव्यात पोलिसांनी त्यास पंच साक्षीदार म्हणून पोलिस स्टेशनमध्ये बोलाविले होते व त्या ठिकाणी त्याची पंचनाम्यावर सही घेतल्याचे सांगितले आहे.

पंच साक्षीदार अभियोगपक्षास फितुर झाल्याने विद्वान सरकारी वकिलांनी सखोल उलटतपास घेतला. उलट तपासणीत विचारलेल्या सूचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तर दिल्यामुळे अभियोगपक्षास आरोपीविरुध्द गुन्हा सिध्दतेसाठी आवश्यक असलेली कोणतीही स्विकृती अभिलेखावर आलेली नाही.

१०. अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. २ पोलिस उपनिरिक्षक सुभाष बाबुराव आव्हाड यांनी त्यांच्या सरतपासामध्ये घटनेच्या दिवशी ते पोलिस नाईक म्हणुन कोपरगाव शहर पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत होते, त्यावेळी मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७–३ अन्वये शस्त्रास्त्र व जमावबंदीचा आदेश पारित केला होता. सहा.पोलिस उपनिरिक्षक पवार यांनी त्यांना व पी.एस.आय.पवार, पो.कॉ.पवार, पो.कॉ.घोरपडे व पो.कौ.काशिद यांना बोलावुन शिवाजी पुतळा, कोपरगाव येथे बजरंग दल व भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी जमाव केल्याचे व सदर जमाव मा.मंत्री श्री.सुशिलकुमार शिंदे यांच्याबद्दल मुर्दाबादच्या घोषणा देत असुन तेथे जावुन कारवाई करण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे ते सर्वजण मोटारसायकलवर घटनास्थळी गेले. सदर ठिकाणी मा.सुशिलकुमार यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले होते, त्या सर्वांनी तहसिलदार साहेब, कोपरगाव यांना जावुन निवेदन दिले. पो.कॉ.काशिद यांनी सर्व लोकांविरुध्द पोलिसात फिर्याद दाखल केली. फिर्यादी पो.कॉ.काशिद हे मयत

आहेत. अशाच आशयाची साक्ष साक्षीदार क्र. ३ सहा.फौजदार संजय पंढरीनाथ घोरपडे यांनी नोंदवुन त्यांच्या कथनास पुष्टी दिली आहे.

**११.** वरील दोन्ही साक्षीदारांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता, त्यांच्या उलटतपासात शिवाजी पुतळ्याजवळ चौफुली व मुख्य बाजारपेठेचा चौक आहे तसेच सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणत लोकांची वर्दळ असते असे मान्य व कबुल केलेले आहे. परंतु, सदर साक्षीदाराने त्याने स्वतः मा.सुशिलकुमार शिंदे यांचा पुतळा जाळताना कोणालाही बघितले नसल्याचे, आरोपी हे बजरंग दल अथवा भारतीय जनता पक्षाचे कार्यकते आहेत किवा नाही व घटनास्थळावरुन कोणालाही अटक करण्यात आली नसल्याचे कबुल केले आहे.

**१२.** अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. २ व ३ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये अभियोगपक्षास परिपोषक साक्ष दिली असली तरी सदर साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासामध्ये आरोपींनी त्यांनी घटनास्थळी मा.सुशिलकुमार शिंदे यांच्या पुतळ्याचे दहन करताना बघितलेले नाही. तसेच, घटनास्थळ हे शहरातील मुख्य बाजारपेठ व लोकांची वर्दळ असल्याचे कबुल केले आहे. परंतु अभियोगपक्षातर्फे त्यांच्या कथनास पुष्टी देणारा अन्य प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही.

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

१३. साक्षीदार क्र. २ व ३ यांनी त्यांच्या पुराव्यात घटनेच्या दिवशी मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांनी मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७(१)(३) अन्वये शस्त्रास्त्र व जमावबंदीचा आदेश पारित केल्याबाबत सांगितले आहे. परंतु, सदर आदेशाची सक्षम अधिका–याने प्रमाणीत केलेली प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. तसेच, सदर आदेश हा सार्वजनिकरित्या प्रसिध्द करण्यात आला होता याबाबत उपरोक्त दोन्ही साक्षीदारांनी अवाक्षर देखील सांगितलेले नाही. त्यामुळे, घटनेच्या दिवशी जमाव व शस्त्रास्त्रबंदी आदेश पारित करण्यात आलेला होता किंवा कसे याबाबत साक्षीदारांच्या कथनास पुष्टी देणारा कोणताही सबळ कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, सबळ पुराव्याअभावी वरील दोन्ही साक्षीदारांच्या कथनाच्या सत्यतेबाबत शंका उपस्थित होत

१४. अभिलेखावर आलेला त्रोटक पुरावा व साक्षीदारांच्या साक्षीत आलेली स्विकृती विचारात घेता घटनेच्या दिवशी व वेळी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी पारित केलेल्या जमाव व शस्त्रास्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करुन बेकायदेशीर जमाव जमविला व मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७(१)(३) शिक्षापात्र कलम १३५ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने शंकेच्या पलिकडे निर्विवादपणे शाबीत केलेले नाही. त्यामुळे, आरोपी हे शंकेचा फायदा मिळण्यास पात्र आहेत.

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

१५. सबब, वरील कारणमिमांसा विचारात घेता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन न्यायाच्या हेतुस्तव पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ सय्यदनुर कारभारी शेख, क्र.२ विनायक मुरलीधर गायकवाड, क्र.३ रविकिरण शंकरराव ढोबळे, क्र.४ अक्षय अरविंद क्षत्रिय, क्र.५ बाळासाहेब माणिकराव वाघ, क्र.६ चेतन टेकचंद खुबाणी, क्र.७ राजेंद्र बाबुराव खैरे, क्र.८ सुभाष सुखदेव दवंगे व क्र.९ राजेंद्र अशोकराव खिलारी यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये मुंबई पोलिस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ च्या शिक्षापात्र गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे पुर्वीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम **४३७–अ** अन्वये रुपये ५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका व तेवढ्याच रकमेचे लायक जामिनदाराचे बंधपत्र द्यावे. सदरचे बंधपत्र सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल. |

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR

Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Date: 2026.05.12 16:24:57 +0530

( संजय छ. खैरनार )

कोपरगाव
दिनांक १२.०५.२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोपरगाव, ता. कोपरगाव, जि.अ.नगर.

(संजय छ. खैरनार)

दिनांकः १२.०५.२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | आर. एम. अरगडे |
| न्यायालयाचे नाव | : | २रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव. |
| आदेशाची/न्यायनिर्णयाची तारीख | : | १२.०५.२०२६ |
| आदेश / न्यायनिर्णयावर पीठासन अधिकरी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १२.०५.२०२६ |
| आदेश / न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १२.०५.२०२६ |

(संजय छ. खैरनार)
दिनांकः १२.०५.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.